# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 23.06.2025** **वार-सोमवार**

---

**<u>शिवराज</u>**

सामाजिक संवेदनशीलता जपत गरीब सामान्य माणसाचा सुखांक वाढवणं ही समाजाची खरी गरज आहे, असं मत केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांनी आज पुण्यात व्यक्त केलं. माइर्स एमआयटी शिक्षण संस्था समूहातर्फे कोथरूडमध्ये उभारण्यात आलेल्या श्री सरस्वती कराड रुग्णालयाचं उद्घाटन गडकरी यांच्या हस्ते झालं; त्यावेळी ते बोलत होते. राज्याचे उच्च आणि तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, विद्यापीठाचे संस्थापक अध्यक्ष प्राध्यापक विश्वनाथ कराड, आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. सध्या देशात वैद्यकीय सुविधांचा वेग वाढला असून रुग्णांना दर्जेदार सेवा मिळत आहेत. यात सरकारबरोबरच खाजगी संस्थांचा सहभागही महत्त्वाचा आहे, असं गडकरी म्हणाले.

**<u>एमआयटीगडकरी</u>**

एमआयटी-वर्ल्ड पीस युनिव्हर्सिटीनं सस्टेनेबल टनेलिंग फॉर बेटर लाइफ या विषयावर एका आंतरराष्ट्रीय परिषदेचं आयोजन केलं होतं; या परिषदेलाही गडकरी आज उपस्थित होते. देशाच्या विविध भागात मोठ्या प्रमाणात बोगद्यांचं काम सुरू आहे; या कामात कृत्रिम बुद्धिमत्ता आणि संशोधनाची जोड देऊन राष्ट्र निर्माणासाठी योगदान द्यावं, असं आवाहन गडकरी यांनी या क्षेत्रातील तज्ज्ञांना केलं.

**<u>गडकरीरासने</u>**

केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांनी आज आपल्या पुणे दौऱ्यात शनिवारवाडा ते स्वारगेट या प्रस्तावित चौपदरी भुयारी मार्गाच्या दृष्टीनं पाहणी केली. काकासाहेब गाडगीळ पुतळा, शनिवारवाडा मुख्य प्रवेशद्वार या ठिकाणी भेट देऊन त्यांनी प्रकल्पाची माहिती घेतली. पुणे शहराच्या मध्यवर्ती भागातील वाहतूक कोंडीचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली काढण्यासाठी हा भुयारी मार्ग महत्वाचा ठरणार आहे; त्यामुळे या प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करून द्यावा अशी मागणी आमदार हेमंत रासने यांनी गडकरी यांच्याकडे केली. त्यावर गडकरी यांनी सकारात्मक प्रतिसाद देत संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांसह बैठक घेण्याचं आश्वासन दिलं आहे.

**<u>अमोलकोल्हे</u>**

पुणे नाशिक सेमी हाय स्पीड रेल्वे प्रकल्प मूळ आराखड्यानुसार व्हावा अशी मागणी शिरूरचे खासदार अमोल कोल्हे यांनी केली आहे. या संदर्भात रेल्वे विभागाने आज एक बैठक आयोजित केली होती; त्यानंतर कोल्हे यांनी पत्रकारांशी संवाद साधला. प्रत्येक आराखडा तयार करताना रेल्वे विभागाने सर्वांगीण विचार करावा, तसंच नव्याने विकसित होणाऱ्या हडपसर टर्मिनल संदर्भात देखील एक बैठक आयोजित करावी अशी सूचना कोल्हे यांनी केली.

<u>Pcmc</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी विभागाने थकबाकीदारांना त्वरित कराचा भरणा करण्याचे आदेश जारी केले आहेत. महानगरपालिकेने सिद्धी उपक्रमा अंतर्गत महिला बचत गटांमार्फत ६ लाख ३५ हजार मालमत्ता धारकांना घरोघरी जाऊन देयकांचं वाटप केलं आहे. त्याचबरोबर अनेक

मालमत्ताधारकांना जप्तीच्या नोटीसा देखील पाठवण्यात आल्या असून, लवकरच जप्तीची कारवाई देखील केली जाणार आहे.

**विद्यापीठ**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात परीक्षा आणि मूल्यमापनविषयक सर्व सेवा आता कागदविरहित केल्या जाणार आहेत. यासाठी स्वतंत्र संकेतस्थळ विकसित करण्यात आलं आहे, अशी माहिती परीक्षा आणि मूल्यमापन विभागाचे संचालक डॉ. प्रभाकर देसाई यांनी दिली. विद्यापीठातील विभाग आणि संलग्न महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना आतापर्यंत ट्रान्सस्क्रिप्ट, पदवी प्रमाणपत्र, गुणपत्रक या महत्त्वाच्या कागदपत्रांसाठी ऑनलाइन अर्ज करून त्या अर्जाची प्रत विद्यापीठाच्या विद्यार्थी सुविधा केंद्रातही जमा करावी लागत होती; मात्र आता त्यासाठी grievance.unipune.ac.in हे स्वतंत्र संकेतस्थळ आणि कक्ष स्थापन करण्यात आला आहे.

**सीसीटीव्ही**

शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांमधून क्षमतेपेक्षा जास्त विद्यार्थ्यांची वाहतूक होत असल्याच्या तक्रारी आल्यानंतर पुणे पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी विद्यार्थी सुरक्षिततेसंदर्भात नियमावली जारी केली असून या नियमांची काटेकोर अंमलबजावणी करण्याबाबत निर्देश परिवहन विभागाला दिले आहेत. त्यानुसार नियमांचं काटेकोर पालन होत आहे किंवा नाही हे तपासण्यासाठी पुणे उपप्रादेशिक परिवहन विभाग तपासणी मोहीम राबवणार आहे. दरम्यान शालेय विद्यार्थ्यांची वाहतूक करणाऱ्या वाहनांमध्ये सीसीटीव्ही बसवण्यासाठी ३१ जुलैची मुदत देण्यात आली आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज दिवसभर ढगाळ वातावरण असून अधून मधून पावसाच्या हलक्या सरी पडत आहेत. आज कमाल तापमान २९ आणि किमान तापमान २२ पूर्णांक ७ दशांश अंश सेल्सियस नोंदवण्यात आलं. उद्याही आकाश ढगाळ राहून हलक्या पावसाची शक्यता पुणे वेधशाळेनं वर्तवली आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**